# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१०/२०२३** **दिनांक ०३/०७/२०२३**

**स्थळ- साई निवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी १०.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सी.ए. नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दि.०३/०७/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१३७२/२०२३, दि.०२.०७.२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दि.०३/०७/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**

**मा.श्री.पी.शिवा शंकर, भा.प्र.से.,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी**

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१** **दि.३०.०५.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४३२** **दि.३०.०५.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२२, निर्णय क्र.४२८ सोडून उर्वरीत इतर सर्व विषयावरील निर्णय वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** **चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१.** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ या वार्षिक खरेदीमधील Tablet, Injection व Syrup करीता दर निश्चीती (Rate Contract) करणेकामीच्या पात्र ऑनलाईन कमर्शिअल ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करणेस व ज्या औषधांकरीता दर प्राप्त झालेले नाहीत त्याकरीता फेर ई-निविदा मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.४३३/१ चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**२.** **सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षण नेमणूकीसाठी फेर प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४३३/२ चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**३.** **सन २०२३-२४ करिता कंत्राटी सुरक्षा व माजी सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करण्यासाठी दाखल करण्यात आलेले सिव्हील ॲप्लीकेशन क्रं. ३६८१/२०२३ मंजूर होऊन नवीन कंत्राटदाराला पुढील कार्यादेश देवून त्याने प्रत्यक्ष कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेचे आदेशाचे दिनांकपावेतो सध्याचे कंत्राटदार यांना सध्या चालू आहे त्या दरात मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.४३३/३ चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**७४ एम.एस.एफ. सुरक्षा रक्षक नियुक्त केल्यानंतर नव्याने हिशोब करुन पद संख्येच्या प्रमाणात कमी करुन त्याबाबतचा खुलासा सी.ए. मध्ये मा.उच्च न्यायालयात दाखल करावा.** **(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.३ श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग व नवीन शैक्षणिक संकुल बांधकामाचे तांत्रिक लेखापरिक्षण करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधील निम्नतम दरधारक सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, अंधेरी (पश्चिम), मुंबई यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४३४ फेर वाटाघाटीनंतर अ.नं.२ सीओईपी सिव्हील इंजिनिअरींग कॉलेज, पुणे यांनी रु.७५,००,०००/- चे नवीन दरपत्रक पाठविले आहे आणि अ.नं.१ चे सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, अंधेरी (पश्चिम), मुंबई हे निम्नतम दरधारक रु.८८,५०,०००/- या रकमेवर कायम राहिले व कमी करण्यास तयार नाही.**

**सीओईपी सिव्हील इंजिनिअरींग कॉलेज, पुणे यांचे रु.७५,००,०००/-हा दर दि.२८.०३.२०१८ चे शासन नामनिर्देशीत मंडळ (Empanelled Panel) शासन निर्णयातील दरापेक्षा आत असल्याने व निम्नतम असल्याने तो स्विकारणेस मान्यता देण्यात आली. सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.४ श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा-२०२३ कार्यक्रम साई आश्रम भक्तनिवास येथील टेन्साईल फॅब्रीकशेडमध्ये आयोजीत करणेसाठी आवश्यक मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.४३५ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५ संस्थानचे मुंबई येथील साई निकेतन इमारतीच्या कौलारु छताचे नुतनीकरण व आऊटहाऊसचे छताचे वॉटर प्रुफींग करणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारकास कार्यादेश देणेविषयी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.४३६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६ साई धर्मशाळा परिसरातील सर्व इमारतींचे आतील व बाहेरील बाजूने रंगकाम करणे व इमारतींचे संडास, बाथरूमचे नुतनीकरण करणे कामासाठी येणारे अपेक्षित रु.१४,३४,५२,५४६/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.४३७ स्थळ निरिक्षण करण्याची गरज आहे. याकामी आधुनिक साधने / उपकरणे यांचा वापर करण्याची आवश्यकता आहे.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.७** **श्री साईबाबा संस्थानचे परिसरात भक्तांना बसण्यासाठी कॉंक्रीट गार्डन व साई आश्रम करीता एसएस बेंचेस बसविणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३८** **कॉंक्रीट बेंचेस व एसएस बेंचेसचे विविध नमुन्यांसह (फोटो) प्रस्ताव सादर करावा.**
**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.८** **संस्थानचे मंदिर परिसरातील शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीमधील प्रशासकीय कार्यालये साईनिवास अतिथीगृह येथील तळमजल्याचे जागेत स्थलांतरीत करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,८२,७१,८५९/-चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३९** **स्थळ निरिक्षण करण्याची आवश्यकता आहे.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.९** **शैक्षणिक संकुल प्रकल्पातील शालेय इमारतीकरीता फर्निचर वर्क, ऑडीटोरीअम फर्निचर, खेळाचे मैदान विकसीत करणे व अनुषंगीक सिव्हील व इलेक्ट्रीकचे कामांचे सुधारीत रक्कम रु.५४,२३,१८,४४६/-मात्रचे अंदाजपत्रकास मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे माहितीस्तव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४४०** **अशा प्रकारच्या डिजीटलायझेशन असलेल्या शाळांचे/विद्यालयांचे निरिक्षण करणेकामी सुटीचे दिवशी आयोजीत करण्यात यावे.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१०** **संस्थान मार्फत साजरे करण्यात येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप उभारणीकामी संस्थान मार्फत मंडप साहित्य खरेदी करणे व मंडप उभारणीचे काम मंडप ठेकेदार यांचेकडून मजुरी दराने करुन घेणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७८,६०,३४२/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४१** **अधिक माहिती मागविण्यात आलेली आहे. म्हणून तहकुब.**
**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.११** **साईआश्रम भक्तनिवास येथील ३२० केव्हीए जनरेटरच्या सिक्रोनायझिंग पॅनलमधील कंन्ट्रोलर व त्या अनुषंगीक स्पेअर नव्याने खरेदी करुन बसविणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.६,३१,८९०/-मात्रचे खर्चास तसेच सदरकामी संस्थानचे विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४२ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-विद्युत विभाग)**

---

**विषय नं.१२ श्री साईबाबा संस्थानचे विविध क्षमतेचे एकूण २३ नग कमिन्स मेक जनसेटच्या डिझेल इंजिनचे 'बी' चेक सर्व्हीसिंग कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर यांचेकडून संस्थानचे विहीत पध्दतीने करुन घेणेस व त्याकरीता येणा-या रक्कम रु.९,१८,५१५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४३ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**विषय नं.१३ माहे जून-२०२२ ते फेब्रुवारी-२०२३ जमा-खर्चाची नोंद घेण्यास्तव प्रस्ताव फेरसादर.**

**निर्णय क्र.४४४ नोंद घेतली. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१४ रुग्णवाहिका सेवा आकार दर वाढविणेबाबत.**

**निर्णय क्र.४४५ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (आर.टी.ओ.), श्रीरामपूर यांचेकडून रुग्णवाहीकेचे सध्याचे शासकीय दर प्राप्त करावे. (कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**विषय नं.१५ श्री साईबाबा शैक्षणिक संकुल (नविन), औदयोगिक प्रशिक्षण संस्था व प्रसादालय या ठिकाणी एकूण ११ नग नवीन रोलींग शटर्स तयार करून बसविणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४६ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१६ सोलर हॉट वॉटर सिस्टीम करीता नवीन हॉट वॉटर स्टोअरेज टॅंक खरेदीकामी प्राप्त फेर ई-निविदेतील निम्नत्तम दरधारक यांचेसोबत चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४४७ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा/वाटाघाटी करुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१७ श्री साईबाबा हॉस्पिटल येथील जुने सेंट्रल ए.सी.यंत्रणा बायबॅक करुन नवीन सेंट्रल ए.सी.यंत्रणा उभारणी करणे तसेच सर्व ऑपरेशन थिएटर नुतनीकरण करावयाचे कामास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.४४८ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१८ श्री साईबाबा संस्थानचे वाहन विभागातील वाहनांना GPS कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी शासनाचे GeM Portal वर खरेदी प्रक्रिया राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.४४९ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.१९ महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-२०१३/२२/प्र.क्र.क्र.७०/का.१६, दि.१७ सप्टेंबर,२०१९ चे निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने सामावून घेतलेल्या कुशल/अकुशल कर्मचा-यांना प्रतिदिन किमान वेतनावर ४० टक्के वेतनवाढ लागु करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५० या खर्चास अंदाजपत्रकात तरतुद नाही. खर्चाची रक्कम ५० लाखापेक्षा जादा आहे. त्यामुळे सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.**
**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२० शैक्षणीक वर्ष २०२३-२४ साठी आवश्यक शिक्षक (Ad –hoc) पद भरतीकामी मुलाखतीकामी तज्ञ समिती गठीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५१ शैक्षणीक वर्ष २०२३-२४ साठी आवश्यक शिक्षक (Ad –hoc) पद भरतीसाठी मुलाखतीकामी समितीचे वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मनोनीत केले आहे. जिल्हाशिक्षणाधिकारी (प्राथमिक) प्रतिनिधी व विषयतज्ञ शिक्षक यांची समिती याकामी गठीत करण्यात येत आहे. (कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

---

**विषय नं.२१ श्री साईबाबा महाविद्यालय -Ad -hoc सहा. प्राध्यापक मुदतवाढ व शैक्षणीक वर्ष २०२३-२४ करीता प्राध्यापक भरती करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५२ प्रस्तावामधील परिशिष्ट अ मधील शिक्षकांना विद्यापीठाचे नियमानुसार सेवा खंड देऊन मुदतवाढ देण्यात यावी. १७ (Ad-hoc) सहा. प्राध्यापक पदांची सन २०२३-२४ करीता जाहिरात देऊन भरती करणेकामी मंजूरी देण्यात आली. निवड समिती मा.अध्यक्ष यांनी मनोनीत केलेले समितीचे प्रतिनिधी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, अहमदनगर जिल्हातील मान्यता प्राप्त वरिष्ठ महाविद्यालयापैकी एका वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य / संबधीत विषयाचे विभागप्रमुख, अहमदनगर जिल्हातील मान्यता प्राप्त वरिष्ठ**

**महाविद्यालयापैकी एका वरिष्ठ महाविद्यालयाचे संबधीत विषयाचे तज्ञ यांचा निवड समितीमध्ये समावेश राहिल.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.२२ श्री साईबाबा महाविद्यालय Ad-hoc सहा प्राध्यापक, ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांचे मानधन वाढीबाबत.**

**निर्णय क्र.४५३ तहकुब. (कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.२३ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयास अनुसरून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी गणवेश खरेदीबाबतची वस्तुस्थिती शासनाचे निदर्शनास आणून दिलेनंतर याबाबत शासनाकडून प्राप्त झालेल्या पत्रांबाबत.**

**निर्णय क्र.४५४ नोंद घेतली. (कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२४ सन २०२३-२४ करीता श्री साई प्रसादालयातील प्रसाद भोजनामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन फेर ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४५५ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.२५ सीसीटीव्ही यंत्रणेसाठी तांत्रिक समितीचे सदस्यतेबाबत.**

**निर्णय क्र.४५६ विनामुल्य सेवा देण्यास / सादरीकरण करण्यास तयार असतील तर त्यांना तशी विनंती करण्यात यावी. (कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.२६ नवीन दर्शनरांग इमारतीत श्रींचे स्थानिक लाईव्ह दर्शन व्यवस्था सुरू करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५७ तहकुब. (कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.२७** माहे एप्रिल-२०२२ ते मार्च-२०२३ अखेर लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणेबाबत.

**निर्णय क्र.४५८** नोंद घेतली. (कार्यवाही-कामगार विभाग)

---

**विषय नं.२८** सन २०२२-२३ मध्ये दर्शन रांगेत मोफत वाटप करणेत आलेल्या चहा कॉफी,दुध व बिस्कीटे वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.

**निर्णय क्र.४५९** नोंद घेतली. (कार्यवाही-कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.२९** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड व विभागाकरिता Syringe pump खरेदीकामी रक्कम रु.२७,८५,५१६/- इतक्या अंदाजे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४६०** हापकिन्स सोबत चर्चा करावी तेथे न झाल्यास ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. प्रस्ताव मंजूर. खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.३०** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता लागणारे एकलस्त्रोत (Monopoly) साहित्य खरेदी कामी पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.४६१** प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करण्यात यावा.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)

---

**विषय नं.३१** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता सन २०२३-२४ या वार्षिक खरेदीमधील On Consignment Basis Material, Laboratory, Dialysis, Suture, Homeopathic, Ayurvedic & Dental करीता दर निश्चीती (Rate Contract) करणेकामीच्या पात्र ऑनलाईन कमर्शिअल ई-निविदेतील निम्नतम दरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करणेस व ज्या मटेरीअल करीता दर प्राप्त झालेले नाहीत त्याकरीता फेर ई-निविदा मागविणेबाबत.

**निर्णय क्र.४६२** प्रस्ताव मंजूर. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा/वाटाघाटी करावी.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**विषय नं.३२** **संस्थानचे दोन्ही रुग्णालयाचे मंजूर उपचार दरातील व तज्ञ डॉक्टरांना कामाच्या प्रमाणात देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्यामध्ये सुधारणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६३** **अधिक माहितीची आवश्यकता आहे म्हणून तहकुब.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३३** **NIC यांनी विकसीत केलेली e-Hospital ही प्रणाली संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलकरीता विनामुल्य मोफत उप लब्ध करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४६४** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३४** **श्री साईनाथ रुग्णालयातील माहे जुलै २०२२ ते मार्च २०२३ या आर्थिक वर्षातील वैदयकीय उपचार व औषधासाठी झालेल्या रक्कम रु.४,७९,७०,६६४/- च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६५** **नोंद घेतली.** **(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**वरील निर्णय क्र.४३२ ते ४६५ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर दुपारी १.०० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(पी.शिवा शंकर,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**